महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-४/ कॅम्प पुणे
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : 22/08/2020

# परिपत्रक

**विषय : कोवीड-१९ च्या व्यवस्थापनावाबत राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र मासं/रवका/न.क्र. ९/कॅप पुणे दि. २२.०३.२०२०.
२) परिपत्रक क्र मासं/रवका/न.क्र. ९/Covid-१९-१/कॅप पुणे दि. १३.०४.२०२०.
३) केंद्र शासन आदेश क्र. ४०-३/२०२०-डीएम-I(ए) दि. १५.०४.२०२०.
४) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/डीसएम-१ दि. १५.०४.२०२०.
५) महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/डीसएम-१ दि. १७.०४.२०२०.
६) शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रवका) दि. १८.०४.२०२०
७) परिपत्रक मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-२/९१५६ दि.१९.०४.२०२०
८) महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/डीसएम-१ दि. २१.०४.२०२०.
९) शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रवका) दि. २१.०४.२०२०

महाराष्ट्र शासनाकडून संदर्भ क्र ५ मधील आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या अनुषंगाने **कोवीड-१९** च्या व्यवस्थापनाबाबत तसेच बंद (Lock Down) शिथील झाल्यानंतर कार्यालये, कामाची ठिकाणे, कारखाने आणि आस्थापना यांच्याकरीता सामाजिक अंतर राखण्याबाबतची आदर्श कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

२. राज्य शासनाच्या उपरोक्त आदेशान्वये राज्यात काही निवडक संस्था आणि आस्थापना यांच्याकरीता दि. २०.०४.२०२० पासून बंद शिथील करण्यात आला आहे. त्यानुसार महावितरण कंपनीचा सदर आस्थापनांमध्ये समावेश होतो. यास्तव बंद शिथील करीत असतांना महावितरण कंपनीमध्ये व्यवस्थापनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र ७ अन्वये निर्गमीत केल्या आहेत

३. आता, मुंबई महानगर प्रदेश (MMR) व पुणे महानगर प्रदेश (PMR) येथे वाढत असलेल्या **कोवीड-१९** (कोरोना) विषाणूच्या संसर्गामुळे निर्माण झालेला धोका रोखण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्य यांचे संदर्भीय आदेश क्र ८ अन्वये, दि.१७.०४.२०२० रोजी पारित केलेला शासन आदेशान्वये दिलेली शिथीलता रद्द करुन, दि.१७.०४.२०२० पुर्वी अस्तीत्वात असेलेली बंधने पुनःश्च लागू केली असुन, त्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश (MMR) व पुणे महानगर प्रदेश (PMR) या कार्यक्षेत्रामध्ये येणारी महावितरण कंपनीच्या कार्यालयांनी वरील संदर्भीय क्र ८ च्या शासन आदेशाची योग्य ती अंमलबजावणी करावी.

४. महाराष्ट्र शासनाने संदर्भीय क्र ९ अन्वये लॉकडाउन कालावधीत शासकीय कार्यालयामध्ये कामकाज करण्यासाठी उपस्थित राहण्यापासून सर्व दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना सूट दिली आहे. याच धरर्तीवर, माहावितरण कंपनीमधील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयामध्ये कामकाज करणेसाठी उपस्थित राहण्यापासून नियंत्रण अधिकारी सुट देऊ शकतील.

५. महावितरण कंपनीचे संदर्भीय क्र ७ चे परिपत्रकातील इतर सुचना अबाधीत रहातील.

६. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : १) दि. २१.०४.२०२० रोजीचा शासन आदेश.
२) दि. २१.०४.२०२० रोजीचा शासन निर्णय.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)